दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१३४ रविवार,दि.१९ जानेवारी २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-134 | Sunday, Dt.19 January 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## लाचखोर वरिष्ठ लिपिक संतोष कुडकेला १० दिवसांनी मिळाला जामीन



बीड ।प्रतिनिधी
सेवानिवृत्त शिक्षकांकडून ५० हजाराची लाच घेताना बीडच्या माध्यमिक शिक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक संतोष कुडके यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. लाचखोर संतोष कुडके याला अखेर १० दिवसांनी शुक्रवार दि. १७ जानेवारी

(उर्वरीत पान २ वर)

# सुदैवाने बीड जिल्ह्याला पहिल्यांदाच मिळाले बारामतीच्या पवारांचे पालकत्व

## पण राजकीय द्वेषामुळे दोन मंत्री असतानाही भूमिपुत्रांना बीडचं पालकत्व मिळाले नाही हे दुर्दैवच !

बीड / वैभव स्वामी

बीड जिल्ह्यामध्ये सहापैकी पाच आमदार महायुतीचे निवडून आले. या विजयाचे श्रेय सर्वस्वी तत्कालीन पालकमंत्री आणि परळी मतदारसंघातून विक्रमी मताने विजयी झालेले धनंजय मुंडे यांना देण्यात आले. मात्र मागील दीड महिन्यापासून सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर विरोधक आणि पक्षांतर्गत विरोधकांनी सूडबुद्धीने राजकीय हल्ले चढवले. या राजकीय द्वेषामुळे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद धनंजय मुंडे यांना मिळाले नाही.एवढेच नव्हे तर त्यांच्या बहिण असल्यामुळे भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यांना देखील बीडचे पालकमंत्री पद दिले गेले नाही. त्यांना जालना जिल्ह्याचे पालकमंत्री पद देण्यात आले आहे. मात्र सुदैवाने बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच बारामतीच्या पवारांना म्हणजेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अर्थमंत्री असलेले अजित दादा पवार यांच्याकडे थेट बीडचे पालकत्व देण्यात आले. आता बीड जिल्ह्याचे नाव भविष्यात बारामतीच्या धरतीवर विकासाचा एक नवा पैलू म्हणून उदयास येणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने दादांच पालकत्व बीडकरांसाठी नवी दिशा देणारे ठरेल.

महाराष्ट्रामध्ये भाजपा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले मात्र मुख्यमंत्री कोणाला करायचे ? यावरून अंतर्गत पेटलेल्या संघर्षा मधून सरकार स्थापनेला एक महिना वाट पाहावी लागली. अखेर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस अपेक्षेप्रमाणे विराजमान झाले. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासाठी सरकार बहुमतात असताना देखील पुन्हा एक महिना वाट पाहावी लागली. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. मात्र पालकमंत्री पद कोणाला कोणत्या जिल्ह्याचे पालकत्व द्यायचे यावरून पेटलेल्या अंतर्गत वादामुळे पुन्हा एकदा पालकमंत्री पदाचे घोंगडे तीन महिन्यापासून अडकले होते. अखेर त्यावर मार्ग निघाला आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सहमती दिल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री पद जाहीर करण्यात आले आहे. बीड जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच बारामतीच्या पवारांकडे बीडचे पालकमंत्री पद आले आहे.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आता थेट बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने या मागास बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी बीडच्या पालकमंत्र्याकडे राज्याच्या तिजोरींची चावी असल्याने खऱ्या अर्थाने फायदा होण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास बारामतीच्या धर्तीवर जर पवारांनी केला तर मागास जिल्हा म्हणून असलेली बीडची ओळख कायमची पुसली जाऊन विकासाची नवी ओळख पवार साहेबांमुळे निर्माण होण्याचा इतिहास रचला जाऊ शकतो. पवार साहेबांनी केवळ झेंडा मंत्री न होता म्हणजे झेंडावंदनालाच उपस्थित राहायचे बीड जिल्ह्याचे पालकत्व खऱ्या अर्थाने आता स्वीकारून बीडची विस्कटलेली घडी पुन्हा एकदा बसवावी अशी रास्ता अपेक्षा सामान्य बीडकरांची असणार आहे



### पंकजा मुंडे आता जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री



यापूर्वी महायुतीच्या सरकारमध्ये पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री होत्या. त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न खऱ्या अर्थाने झाला. त्यांच्या पालकमंत्रीच्या कार्यकाळात कोणत्याही मतदारसंघातून अन्याय होतो अशी ओरड आली नाही. असे असतानाही केवळ त्या घटनेमुळे बीडच्या पालकमंत्री पदी मुंडे नको असा बीड जिल्ह्यातीलच काही राजकीय नेत्यांनी टोकाची भूमिका घेत राजकीय विरोध केल्याने बीड जिल्ह्याला दोन मंत्री असतानाही पालकमंत्री पद मिळाले नाही. आता पंकजा मुंडे जालना जिल्ह्यात आपली छबी कशी निर्माण करतात हे येणारा काळ ठरवेल.

### मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हा अन्याय नाही का ?



मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांची निर्दयीपणे क्रूर हत्या करण्यात आली. हत्ये पूर्वी आवादा कंपनीतील कथीत दोन कोटीच्या खंडणी प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मित्र वाल्मीक अण्णा कराड यांच्यावर गुन्हा दाखल झाला. त्यामुळे रान उठवले गेले. राजकीय द्वेष इतका पेरला की बीड जिल्ह्याला बिहार करून टाकले. बीड जिल्ह्याचे नाव कलंकित करून टाकले. या प्रकरणात पोलीस तपासात किंवा न्यायालयीन प्रक्रियेमध्ये आजतागायत कुठेही धनंजय मुंडे यांचा सहभाग असेल असे रेकॉर्डवर आलेले नसताना केवळ राजकीय वस्त्रहरण करण्यासाठी त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मागण्याचे नाट्य सुरू झाले. एवढेच नव्हे तर त्यांना बीडचेच नव्हे तर कोणत्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद देऊ नये यावर सरकारला धारेवर धरण्यात आले. त्यामुळे विकासाची दृष्टी असलेल्या बीडच्या या भूमिपुत्राला सन्मानाचे मिळणारे पालकमंत्री पद आज नाकारण्यात आले आहे. राजकीय हेव्यादाव्या पोटी बीड जिल्ह्याचे आणि बीड जिल्ह्यातील एका उदयास येणाऱ्या नेतृत्वाचे हे मोठे नुकसान म्हणजे बीड जिल्ह्याचे नव्हे काय ? व्यक्तिगत आपल्या स्वार्थापोटी एक उभारले जात असलेले नेतृत्व संपवण्यामागे कसले आले हे स्वार्थी राजकारण.

### दादा बारामतीच्या धर्तीवर बीडचा विकास अपेक्षित...

दादा आपल्याकडे विकासाची मोठी नजर आणि व्हिजन आहे. बारामती सारख्या तालुक्याचा आपण मुंबई पुण्याला लाजवेल असा विकास करून नवा इतिहास रचला. बीड देखील जिल्हा असला तरी महाराष्ट्रातील एक मागास जिल्हा म्हणून ओळख आहे. आता राजकीय गुंडगिरीचा जिल्हा म्हणून नवा चेहरा बीडला मिळत आहे. मिळालेले हे कलंकित चेहरे दादा तुम्ही आता पालकत्व स्वीकारून येणाऱ्या काळात संपवा. बारामतीच्या धर्तीवर बीड जिल्ह्याचा सर्वांगीण नेत्र दीपक विकासाचा पैलू उभारून एक नवा इतिहास रचावा. हा बीड जिल्हा कायम बारामतीच्या पवारांवर प्रेम करणारा जिल्हा आहे. सुदैवाने बारामतीच्या पवारांवर पहिल्यांदाच या राजकीय द्वेषाच्या राजकारणामुळे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळाले आहे. कदाचित दादा आपल्या रूपातून खऱ्या अर्थाने बीडचे पालकमंत्री म्हणून तुम्ही असणार आहात. तुमचे पालकत्व बीडकरांसाठी कायम अविस्मरणीय ठरावं असं आपलं कर्तुत्व व्हावं एवढीच अपेक्षा,आपल्या पालकमंत्री पदाकडून आहेत.




॥ चतुर्थ पुण्यस्मरण ॥
( मृत्यू दिनांक १९ जानेवारी २०२१)
शिवैक्य स्व.जगदेवी विवेक स्वामी येळंबकर
( आदर्श मुख्याध्यापिका जिल्हा परिषद बीड )
स्वर्गात पण जे सुख नाही ना...
ते आई तुझ्या चरणाशी आहे...
कितीही मोठी समस्या असू देत...
फक्त आई या नावातच समाधान आहे...
** शोकाकुल **
सौ.वनमाला विकास स्वामी ( सून - मुलगा )
सौ. वर्षा वैभव स्वामी (सून - मुलगा )
सौ. वैशाली अशोक पडोळे
धर्माबाद जिल्हा नांदेड (मुलगी - जावई )
सौ. रुपाली श्रीकांत स्वामी लातूर ( मुलगी - जावई )
नातू नातवंडे
डॉक्टर सौ. शिवानी आकाश स्वामी लातूर,इंजिनियर शिरिषा उर्फ नेहा इंजिनीयर शशांक उर्फ यश विकास स्वामी, इंजिनीयर वेदांत, श्रावणी - सार्थक वैभव स्वामी, अथर्व, अजिंक्य अशोक पडोळे, जानवी, आदित्य श्रीकांत स्वामी
( स्वामी - येळंबकर - पडोळे परिवार )


## बीडकरांसाठी उमेद प्रदर्शन ठरतंय खरेदी आणि मनोरंजनाचे भांडार

### आज रविवारची सुट्टी एन्जॉयफुली सार्थकी घालवायची असेल तर उमेदला भेट द्याच !





बीड ।प्रतिनिधी
उमेद महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान आणी ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, येथे विविध उत्पादनांच्या विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. एकाच छताखाली ग्रामीण शहरी महिलांनी तयार केलेली विविध उत्पादने अगदी स्वस्त दरात आणि दर्जेदार टिकाऊ वस्तू या दालनामध्ये प्रदर्शन आणि विक्रीसाठी उपलब्ध आहेत.त्याचबरोबर खवय्यांसाठी लज्जतदार नाश्त्यापासून व्हेज नॉनव्हेज जेवण गरमागरम मिळत असल्याने आज बीडकरांनो तुम्ही तुमची रविवारची सुट्टी खऱ्या अर्थाने एन्जॉय फुली सार्थकी लावायची असेल तर या उमेदच्या प्रदर्शन स्थळी भेट देऊन आपल्या बीड जिल्ह्यातील स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिलांना पाठबळ द्यावे. या ठिकाणी आपण हजेरी लावली तर तुमचा आजचा दिवस अविस्मरणीय ठरणार यात शंका नाही.

महिला बचत गटांनी उमेदच्या प्रदर्शन सोहळ्यामध्ये पहिल्याच दिवशी सुमारे चार लाख रुपयांच्या विविध मसाले , पापड , शोभेच्या वस्तु गृहउपयोगी वस्तूंची आणी खाद्य जत्रेमधून स्वादिष्ट रुचकर अशा अस्सल गावराण खाद्य पदार्थाची विक्री केली. उमेद अभियानांतर्गत असलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे विविध उत्पादनांची निर्मित केली जाते. या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर मिनी सरस विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार १६ जानेवारी ते २० जानेवारी २०२५ यादरम्यान बचत गटांच्या उत्पादनांचे

(उर्वरीत पान २ वर)



## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अवघ्या दोन तासात केले जिल्हा परिषद चकाचक

बीड ।प्रतिनिधी
बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणाची आवघ्या दोन तासात स्वच्छता करण्यात आली. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस विकास कामाच्या निमित्ताने बीड जिल्हा परिषदेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.०० ते ९.०० या अवघ्या दोन तासात जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी संपूर्ण जिल्हा परिषदेचा परिसर स्वच्छ झाला. यावेळी जिल्हा परिषदेच्या आवारातील छोटी झुडपे, कचरा आदींची सापसफाई करण्यात आली.

(उर्वरीत पान २ वर)


शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर
डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील
मुळव्याध करीता विशेष उपचार
* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# स्वामित्व योजनेंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सनद वितरणाचा शुभारंभ

## महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री यांच्या हस्ते सनद वितरण






मुंबई ।प्रतिनिधी

स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांशा पुर्ण करत आहे. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले.

केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ.सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकांजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे असे सांगून प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वत:चे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४ पासून आम्ही देशातील नागरिकांचे ड्रोन द्वारे सर्व्हेक्षण करून त्यांना प्रापर्टी कार्ड वितरित करत आहो. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. स्वामित्तव योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्ज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँड सोबत कॉमन सर्व्हीस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री स्वामित्व योजनेतून ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणास चालना - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रधानमंत्री स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाख हून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून, त्यामागे आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल श्री.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते, अलिबाग जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील आणि चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.

बीड येथील कार्यक्रम

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती जिल्ह्यात स्वामित्व योजनेंतर्गत झालेल्या कामकाजाचा लेखाजोखा जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी सादर केला.यानंतर स्वामित्व योजनेची सविस्तर माहिती देणारी लघुचित्रफीत सभागृहात दाखविण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## संपादकीय

# राखावी बाबूंची अंतरे..

जात, धर्म, राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, विचारधारा वगैरे हवा तापवायला ठीक. पण हल्ली कोणतीही निवडणूक मतदारांना आर्थिक लाभ दिल्याशिवाय जिंकता येत नाही हे लोकसभा, त्यापाठोपाठ झालेल्या महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड विधानसभा निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट झालेलेच आहे. तेव्हा दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर केंद्र सरकार जादूगाराप्रमाणे टोपीतून एखादा ससा काढणार ही अपेक्षा होतीच. ती फोल ठरली नाही. कारण केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची नरेंद्र मोदी सरकारची घोषणा. भले पंतप्रधानांनी कधी काळी रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली असेल. पण तो इतरांना द्यावयाच्या उपदेशाचा भाग झाला. लोकांना सांगायचे ब्रह्मज्ञान आपण थोडेच पाळायचे असते! त्यामुळे दिल्लीतले चार लाख सरकारी कर्मचारी एका झटक्यात या वेतन आयोग घोषणेने खूश होणार असतील तर ते योग्यच म्हणायचे. दिल्ली काबीज करायचीच या निर्धाराने उतरलेल्या भाजपने आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करून दिल्लीतील सरकारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची मते मिळतील, असा प्रयत्न केल्याचा आरोप होईल. होऊ द्या! वास्तविक प्रथेनुसार २०२६ साली नवा वेतन आयोग येणे अपेक्षित आहेच. पण दिल्ली विधानसभा निवडणुका २०२५ साली आहेत त्याला बिचारे केंद्र सरकार तरी काय करणार? खरे तर दिल्ली विधानसभा निवडणुका ऐन भरात आलेल्या असल्याने अशी घोषणा हा आचारसंहिता भंग असल्याची किरकिर आता काही करतील. करू द्यात! अशा किरकिऱ्यांच्या तक्रारींकडे कसे दुर्लक्ष करावे याचा पुरेसा सराव आयोगाला आहे. शेवटी आयोगही माणसांचा ना. त्यांनाही पोट असते, निवृत्तीनंतरच्या नेमणुका असतात. तेव्हा निवडणुकीत विजय सलामत तो आरोप पचास हे सत्य महत्त्वाचे. असो.

तर सरकारी कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचवावे तसेच त्यांची क्रयशक्ती वाढावी या दुहेरी उद्देशाने वेतन आयोगाच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत सुधारणा केली जाते. या आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा सुमारे ४९ लाख कर्मचारी तसेच ६५ लाख निवृत्तिवेतनधारक अशा एक कोटीपेक्षा अधिक आजी-माजी कर्मचाऱ्यांचा फायदा होईल. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नवीन वेतन आयोगाची घोषणा होताच लगोलग राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून वेतनात वाढ करण्याची मागणी पुढे येते. तशी ती आली. आणि मग राज्याराज्यांमधील सत्ताधाऱ्यांनाही नवा आयोग लागू करण्याशिवाय पर्याय नसतो. केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मोठी मतपेढी असल्याने कोणत्याही सत्ताधाऱ्यांना या वर्गाला नाराज करता येत नाही. भले मग वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करताना केंद्र आणि सर्वच राज्यांची तिजोरी आटली हे कितीही खरे का असेना! सध्या लागू असलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर केंद्र सरकारच्या खर्चात २०१६ नंतर वार्षिक एक लाख कोटींनी वाढ झाली. हा खर्च नंतर वाढतच गेला. आठव्या वेतन आयोगाचा भार यापेक्षाही अधिक असेल. पूर्वी १९९४ मध्ये लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपासून केंद्र व राज्यांचे आर्थिक कंबरडे पार मोडले. विशेषत: राज्ये आर्थिकदृष्ट्या अडचणीत आली आणि त्यातून अद्यापही बाहेर आलेली नाहीत. महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्याला त्या वेळी मोठा फटका बसला. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी पैसे हातउसने घेण्याची वेळ महाराष्ट्रासारख्या श्रीमंत राज्यावर त्यामुळे आली. इतकेच काय पण मंत्रालयातील सहकार सचिवांच्या खुर्चीवर त्या वेळी देणी थकवल्याबद्दल जप्तीही आली. या पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर देशातील एकूणच महसुली खर्चात वाढ झाली; पण त्याच वेळी भांडवली म्हणजेच विकासकामांवरील खर्च कमी झाला, असा निष्कर्ष १५व्या वित्त आयोगाने काढलेला आहे. म्हणजे असे की सरकारने जनतेसाठी करावयाच्या कामांवर खर्च करण्याऐवजी सरकारला आपला गाडा चालवण्यासाठी- म्हणजे कर्मचाऱ्यांच्या वेतनावर आणि निवृत्तांच्या निवृत्तिवेतनावर- अधिक खर्च करावा लागतो. केंद्राच्या एकूण महसुली उत्पन्नाच्या २१.५ टक्क्यांवर १९९५-९६ मध्ये असलेला भांडवली खर्च २०१६ मध्ये १४ टक्क्यांपर्यंत घटला होता. सरकारच्या तिजोरीत जमा होणाऱ्या प्रत्येक १०० रुपयांतले साठभर रुपये या वेतन/ निवृत्तिवेतनावरच खर्च होतात. राहिलेल्या ४० टक्क्यांत जनतेचे काय ते कल्याण करायचे, हे आव्हान. परत लाडक्या बहिणी, कर्जमाफ्या वगैरे आहेतच.

# युसूफ वडगाव पोलीसांच्या कारवाईत अवैध देशी दारू आणि गुटखा जप्त

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १८/०१/२०२५ रोजी युसुफ वडगाव पोलीस ठाणे हद्दीत मौजे बनसारोळा येथे एका बोलेरो जीप मधून टँगो संत्रा दारूची वाहतूक होत असल्याबाबत माहिती मिळाली होती. सदर माहितीवरून युसुफ वडगाव पोलिसांनी सदर जीपची तपासणी केली असता सदर जीपमध्ये १७,५००/- किमतीची टँगो संत्रा देशी दारू अवैधपणे वाहतूक करत असताना चैतन्य बाबासाहेब रांजणकर, रा. युसूफ वडगाव हा मिळून आला. त्याच्यावरती युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करून अवैध पद्धतीने विकली जाणारी दारू व दारू वाहतुकीसाठी वापरली गेलेली बोलेरो जीप असा एकूण २,१७,५००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.



तसेच पोउनि बसवेश्वर चनशेट्टी व इतर अंमलदार हे युसुफ वडगांव पोलिस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना आवसगाव शिवारात केलेल्या वाहन तपासणी मध्ये मुजफ्फर गफार तांबोळी, रा. केज हा त्याचेकडील स्विफ्ट डिझायर गाडीत विमल, बाओबाजी, गोवा, आरएमडी असा १२५८५/- रू. किंमतीचा प्रतिबंधीत गुटखा विक्री साठी वाहतूक करताना आढळून आला. सदर इसमास २,१२,२८५/- रू चे मुद्देमाल व कारसह घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली युसूफ वडगाव पोलीस ठाण्याचे सपोनी मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोउपनि बसवेश्वर चनशेट्टी, पोलीस शिपाई बालासाहेब घोरपडे, पोलिस शिपाई नितीन अतकरे पोलीस शिपाई महादेव केदार,चालक पोलीस शिपाई सादीक आतार यांच्या पथकाने केली आहे.

# जयभवानी चषकांचे शिनुभाऊ बेद्रे यांच्या हास्ते उद्घाटन संपन्न

गेवराई ।प्रतिनिधी

नगरपालिकेचे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यांचा १ जानेवारी रोजी वाढदिवस होता त्या निमित्त भगवती क्रिकेट क्लबच्या वतीने जयभवानी चषकांचे आयोजन करण्यात आले होते या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आज दि.१८ जानेवारीरोजी सकाळी११:०० वाजता शिवसेना तालुकाप्रमुख शिनुभाऊ बेद्रे यांच्या हास्ते उद्घाटन संपन्न झाले होते यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,विलास सुतार, नगरसेवक संजय इगले,नगरसेवक राम पवार, विनायक गिरी,समाधान मस्के, बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, शेख निजाम, पिटु साळवे.दिपक अवघड, दाऊद पठाण, शेख शब्बीर,दिलीप सोनवणे,शेख मुददशीर, शेख नसिर,रजित काबंळे,कृष्णा पाटोळे,बालाजी जाधव, वाजेद पठाण, शेख बाबा,राजेंद्र तातडीया, प्रदीप सुतार, अशोक नांडे, आदी उपस्थित होते, स्पर्धेचे समालोचन आविनाश माळवदे, यांनी केले आहे

## दादासाहेब गिरी यांच्या वाढदिवसानिमित्त दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



तर पंच म्हणून सुधीर जाधव यांनी योगदान दिले आहे तर आयोजन मनोज पाटोळे,दत्ता चव्हाण, रवि उफाड,डिगाबर गिरी, (कर्णधार ) सोनु राठोड, अनिकेत मस्के,बंटी राठोड, सुनिल पवार, शैलेश टाक,सोनु भारती,शंकर खैरे,धनंजय जाधव, आरेफ शेख,अमोल कानाडे,दिलीप धुरंधरे,सुमित भुत्ते,मुन्नासेठ चौधरी,योगेश चव्हाण, शंकर उबदे, आरबाज बागवान, इम्मु बडा,बाळु चव्हाण,प्रवीण इंगळे,आकाश पवार, आदीनी परिश्रम घेतले

# २२ जानेवारी रोजी संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे ह भ प मोहन म. खरमाटे यांचे किर्तन - डॉ राजेंद्र सानप

बीड (प्रतिनिधी)

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे गेल्या १३ वर्षापासुन दरवर्षी वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी दिन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी दि.२२/१/२०२५ बुधवार रोजी सकाळी संत वामनभाऊ यांच्यामुर्ती अभिषेक,आरती व रात्री ८.३० ते ११ यावेळेत संत वामनभाऊ यांच्या जिवन चरीत्रावर जेष्ठ किर्तनकार ह भ प मोहन महाराज खरमाटे यांचे सुश्राव्य किर्तनाचे व प्रसाद वाटपाचे



आयोजन करण्यात आले आहे.

तरी या किर्तनाचा लाभ बीड शहरातील व परीसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप




बीड - भगवान श्रीकृष्ण इस्कॉन मंदिर माळीवेस बीड येथील भगवंताच्या रथाची बीड शहरामध्ये भव्य मिरवणूक निघाली असता प्रभुजीचे स्वागत करून रथ वढण्यात आला. यावेळी भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील, यादवेंद्र प्रभुजी व भक्त मंडळ बीड.

## पान १ वरुन...

### लाचखोर वरिष्ठ लिपिक....

रोजी जामिन मिळाला. कुडकेच्या लाचखोरीमुळे शिक्षण विभागातील लाचखोरीचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील शिपायापासून ते वरिष्ठापर्यंत प्रत्येक जण पैसे घेतल्याशिवाय कामच करत नाही, अशी मोठी चर्चा आहे.

बीड जिल्हा परिषदेत प्रत्येक विभागात सर्रास पैशाची देवाणघेवाण होते. विशेषतः प्राथमिक शिक्षण विभाग आणि माध्यमिक शिक्षण विभागात लाखो रुपयांची उलाढाल बिनबोभाटपणे होते. सेवानिवृत्त शिक्षकांची फाईल असो कि मागील काळातील अप्रूव्हल काढणे ही सगळी कामे पैशाशिवाय होतच नाहीत.

माध्यमिक शिक्षण विभागात सेवानिवृत्त शिक्षकाचे काम मंजूर करण्यासाठी संतोष कुडके यांनी ९० हजार रुपयांची मागणी केली होती. यातील चाळीस हजार रुपये घेतले, उर्वरित पन्नास हजार रुपये स्वीकारताना बुधवारी कार्यालयात अटक केली होती. कुडके याच्याविषयी गंभीर तक्रारी होत्या. या लाचखोरीनुळे माध्यमिक शिक्षण विभागातील अन्य अधिकाऱ्याची चौकशी होणार आहे.माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे हे देखील फाईल'वर वजन ठेवल्याशिवाय काम करत नाहीत, अशी तक्रार करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी यांच्या घरी जाऊन किंवा रस्तावर सह्या घेण्याचे प्रकार सर्रास सुरु आहेत.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ...

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या उपस्थिती स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, कार्यकारी अभियंता पवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

## पान १ वरुन...

श्रीमती मेश्राम, आदीसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होती. जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन आणि सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सात विभाग प्रमुखांची अनुपस्थिती, त्यांच्यावर कारवाई होणार का ?

प्रा.शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागनाथ शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ.ज्ञानोबा मोकाटे, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले, आदीं उपस्थित राहिले नाहीत. जे अधिकारी कर्मचारी गैरहजर होते त्यांच्यावर कारवाई होणार का प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेणार ?

### बीडकरांसाठी उमेद...

भव्य विक्री प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या विक्री प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आव्हान मा. जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रदर्शनामध्ये कटलरी, खाद्यपदार्थ यामध्ये शाकाहारी जेवण, मांसाहारी जेवण, बिर्याणी, मसाले पापड, कुरडई, सांडगे, शेवया, सेंद्रिय गुळ, तोरण, पर्स, ज्वेलरी, कपडे, साडी शोभेच्या विविध वस्तु , दैनंदिन गृहउपयोगी वस्तु अशा विविध वस्तू विक्रीस आहेत. या प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी मा. आदित्य जीवने सर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, तसेच मा. संगीतादेवी पाटील मडम -प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली श्री मूरहरी सावंत -जिल्हा अभियान व्यवस्थापक जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख , श्रीमती आशा पवार , श्री जीवन धापसे इ.सह सर्व ११ तालुक्यातील तालुका अभियान व्यवस्थापक , तालुका व्यवस्थापक , प्रभाग समन्वयक व सर्व सपोर्ट स्टाफ परिश्रम घेत आहेत.

दि.१६/१/२०२५ रोजी सायंकाळी मा.जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब , मा.मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने साहेब , मा.प्रकल्प संचालक श्रीमती

## पान १ वरुन...

संगीतादेवी पाटील मडम , मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके साहेब इ.वरिष्ठ अधिकारी यांनी उमेद गटातील महिलांनी बनवलेल्या अस्सल ग्रामीण स्वादिष्ट व रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला आणि बीडकरांनी देखील प्रदर्शनात येऊन या अस्सल गावरान स्वादिष्ट व रुचकर भोजनाची चव चाखण्याचे आवाहन केले.

बीड जिल्यातील सर्व पत्रकार बांधवांनी प्रदर्शनाला भेट देऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने सर , मा.प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील , मा.अति.मु.का.आ. वासुदेव सोळंके सर इ.सह उमेद गटातील महिलांनी बनवलेल्या चहा, नाष्टा व फराळाच्या विविध पदार्थाचा आस्वाद घेतला व बीड शहरातील नागरिकांना विशेषतः महिलांना या प्रदर्शनास भेट देऊन मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आवाहन केले.

# सहा आरोपींना न्यायालयीन कोठडी

बीड - मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सध्या पोलिस कोठडीत असलेल्या सुदर्शन घुले, जयराम चाटे, महेश केदार, सुधीर सांगळे, प्रतीक घुले व सिद्धार्थ सोनवणे या ६ आरोपींना शनिवारी बीडच्या विशेष मकोका न्यायालयाच्या न्या. सुरेखा पाटील १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

तपासात सध्या पोलिस कोठडीची आवश्यकता नसल्याने एसआयटीच्या अपर पोलिस अधीक्षक किरण पाटील यांनी गरजेनुसार पुन्हा पोलिस कोठडी मागण्याचा हक्क अबाधित ठेवून आरोपींना न्यायालयीन कोठडी द्यावी, अशी विनंती केली होती. दुसरीकडे, केज न्यायालयात वाल्मीक कराडवरील खंडणीच्या गुन्ह्यात मांडलेल्या जामिनावर सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून सोमवारी (२० जानेवारी) ही सुनावणी होणार आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ४० दिवस झाले आहेत. या प्रकरणात सुरुवातीला सुदर्शन घुले, जयराम चाटे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, कृष्णा आंधळे आणि विष्णू चाटे या सात जणांविरोधात खुनाचा गुन्हा नोंदवला गेला होता. तपासात सिद्धार्थ सोनवणे यानेही मदत केल्याचे समोर

# आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी ४५ कोटींचा निधी

## आरटीई शुल्कसाठी ४५ कोटींचा निधी

### निकषानुसार निधी वाटप व्हावा - मनोज जाधव

बीड (प्रतिनिधी)

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गतच्या (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाकडून आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी होत असलेला विलंब आणि या विलंबामुळे शाळांचा आरटीई प्रवेशाबाबत निरुत्साह पहावयास मिळत होता मात्र या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना शुल्क प्रतिपूर्ती देण्यासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाली आहे.

आरटीईअंतर्गत वंचित व दुर्बल घटकांतील मुलांसाठी मोफत प्रवेश व शिक्षण देण्यात येते. प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती राज्य शासनामार्फत करण्याबाबतची तरतूद केली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक यांनी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती शासनास केली होती. २०२४-२५ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी १७३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे. त्यातील ६९ कोटी २० लाख रुपयांचा निधी ५ सप्टेंबर २०२४ रोजी वितरित केला असून, आता ४५ कोटी निधी मंजूर केला आहे. सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या वर्षांच्या प्रतिपूर्तीसाठी प्राधान्याने निधी वितरित होणार आहे.

निकषानुसार निधी वाटप व्हावा - मनोज जाधव

आरटीई प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. हा निधी शासन निकषाप्रमाणे वाटप होणे गरजेचे आहे. मात्र यात काही संस्था चालक अधिकाऱ्यांवर दबाव आणून नियमबाह्य निधी लाटण्याच्या तयारीत आहेत. यामुळे विशेषतः छोट्या संस्था आणि ग्रामीण भागातील संस्था यांच्यावर अन्याय होत आहे. तेव्हा शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमानुसारच हा निधी वाटप करावा अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

खालील निकषाला अनुसरून होणार निधी वाटप

शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करताना विविध बाबींची पडताळणी करण्यात येणार आहे. इयत्ता पहिली




ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल अथवा आरटीई पोर्टलवर जाहीर करणे आवश्यक आहे. शाळांनी शुल्काचा तपशील संकेतस्थळावर नोंद करणे बंधनकारक आहे. शाळेने आरटीईची मान्यताप्राप्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून, ऑनलाइन लॉटरी पद्धतीने शाळेत प्रवेश मिळालेला विद्यार्थी संबंधित शाळेतच शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टलवरून करावी. सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड सरल पोर्टलवर नोंदविलेले असावे, केवळ आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या संख्येपैकी फक्त २५ टक्के संख्या ही प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# अजितदादांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा पुण्यासारखा विकास होईल - धनंजय मुंडे

### अजितदादांच्या पालकमंत्री पदाचे धनंजय मुंडेंनी केले स्वागत केले स्वागत

मुंबई (प्रतिनिधी)

आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची पुण्यासह बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीचे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी स्वागत करत अजित दादांचे अभिनंदन केले असून अजित दादांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचा पुणे जिल्ह्याप्रमाणे विकास व्हावा अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात सध्या सुरू असलेली सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे आपणच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मला न करता उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे अशी विनंती केली होती, असेही धनंजय मुंडे यांनी केलेल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. तसेच



सद्यस्थितीमध्ये मला कोणत्याही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी दिली जाऊ नये, याबाबतही आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विनंती केली होती, त्यांनी ती मान्य केल्याबद्दल त्यांचे आभारही धनंजय मुंडे यांनी मानले असून, आपल्यावर देण्यात आलेल्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील राहू, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या ट्विट मध्ये म्हटले आहे.

# राज्य दिन - क्रीडा सप्ताह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व रत्नभुमी विद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यामाने उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी)

राज्य शासनाद्वारे १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे. दिवंगत खाशाबा जाधव, गोळेश्वर, कराड जिल्हा सातारा यांनी ऑलंपीक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी १९५२ मध्ये पहिले वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृती जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात दर वर्षी क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येतो.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांचे विद्यमानाने रत्नभुमी विद्यालय उमा किरण कॉम्प्लेक्स, शाहुनगर बीड येथे दि. १५ जानेवारी २०२५ ऑलंपीक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन व दि. १५ जानेवारी ते २१ जानेवारी हा क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी जेष्ठ क्रीडा संघटक प्रा.जे.पी.शेळके यांच्या हस्ते खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पन करुन दिप प्रज्वलन करुन क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, क्रीडा संघटन प्रा.दिनकर थोरात, प्रा.गोपाल धांडे, प्रा.विजय पवार, शरद अंदुरे,दिलीप आहेर, मुख्याध्यापक एल.एन. करपे आदी प्रमुख आतिथी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्तावित जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले. प्रस्ताविकामध्ये राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताहाची संपुर्ण माहिती देवुन सहभागी होणे बाबत आवाहन केले.राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह च्या उद्घाटन प्रसंगी प्रा.जे.पी. शेळके, प्रा. विजय पवार यांनी खाशाबा जाधव यांच्या जिवनावर व कार्यावर प्रकाश टाकणारे मार्गदशन उपस्थितांना केले. राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असुन दि. २१ जानेवारी २०२५ रोजी क्रीडा सप्ताहाचे समारोप व जिल्हयात सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी



झालेल्या खेळाडुंचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात येणार आहे. यशस्वीपने आयोजन होणे करीता जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे मार्गदनाखाली क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, सतिष रोठोड, क्रीडा अधिकारी कालिदास होसुरकर, अनिकेत काळे, जितेंद्र आराक, धनेश करांडे, सचिन जाधव, मंगेश वडमारे इत्यादी परिश्रम घेत आहे.

११.४५ वा. देशभक्तीपर समुद्यान स्पर्धा, दि. १५ रोजी स्वच्छता दिवस, दि.१६ रोजी सकाळी ११ वा. सत्नदिप विद्यालय, उमा किरण कॉम्पलेक्स, शाहु नगर, बीड येथे निबंध स्पर्धा, दि.१७ रोजी तालुका क्रीडा संकुल मैदान, खंडेश्वरी मंदीर समोर, बीड येथे सकाळी ११ वा. सॉफ्टबॉल व बेसबॉल खेळाचे प्रदर्शनी यसामने आयोजित करण्यात आले आहेत, दि.१८ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ११ वा. देशामध्ये शांतता राखण्यात युवकांची कर्तव्ये या विषयावर चर्चासत्र, दि. १९ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११ वा. चित्रकला स्पर्धाचे आयोजन तर सप्ताहाचा समारोप कार्यक्रम दि.२१ रोजी दुपारी ३ वा. जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये २१ वर्षा खालील युवक व युवतींना सहभाग घेता येईल. अधिकच्या माहिती करिता कार्यासन अधिकारी रेवननाथ शेलार यांना ९०७५४७६७९१ भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा व जास्तीत जासत युवक युवतींनी युवा सप्ताहानिमीत्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमात सहभागी व्हावे असे जिल्हाक्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी आवाहन केले आहे.

युवा दिन युवा सप्ताह यशस्वीपणे आयोजन करण्याकरिता जिल्हाक्रीडा अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली रेवननाथ शेलार, कालिदास होसूरकर, अनिकेतकाळे, सतिश राठोड, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, सचिन जाधव, राजेंद्र बागलाने, मंगेश वडमोरे इत्यादी परिश्रम घेत आहेत.

# सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कृषिक २०२५ प्रदर्शनास भेट

बीड (प्रतिनिधी)

सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कृषि विज्ञान केंद्र बारामती येथे आयोजीत कृषिक २०२५ या भारतातील सर्वात मोठया प्रात्यक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शनाला दि.१६ जानेवारी रोजी भेट दिली. श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. जी.व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच प्रात्यक्षिकावर भर दिला जातो तसेच महाराष्ट्रात आणि परराज्यातही शैक्षणिक भेटींचे आयोजन केले जाते. दि. १६ ते २० जानेवारी दरम्यान होत असलेल्या कृषिक- २०२५ ला देखील भेट देण्यात आली. या शैक्षणिक भेटीमध्ये महाविद्यालयातील एकूण ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कृषिक-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी फळ पिकांच्या विविध जाती, भाजीपाल्यांचे विविध वाण, विकसित तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत यंत्र, सेन्सर, ड्रोन तंत्रज्ञान, यंत्राद्वारे कलम करण्याच्या पध्दती, हायड्रोपोनिक्स, व्हर्टिकल फार्मिंग, पूर्व अनुमानित शेती तंत्र, ऊसाच्या विविध जाती व तंत्रज्ञान, पाणी देण्याच्या विविध पध्दती, कमी पाण्यावरील शेती, नामांकित कंपन्यांचे भाजीपाला पिकांचे विविध वाणांचे प्लॉट्स, ऑर्किड लागवड, दूध काढण्याच्या मशिनरी, ट्रॅक्टरचलित विविध अवजारे, यंत्र, ऊसतोडणी यंत्र, फवारणी ब्लोअर, तसेच विविध शेती उपयोगी यंत्रसामग्री, गांडूळखत निर्मिती तंत्र, पशु प्रदर्शन यामध्ये विविध प्रजातीचे वळू, गाई, शेळया, कोंबडया ई., पशुखाद्य, विविध कंपन्यांचे स्टॉल, मधुमक्षिका पालन, विविध पिकांचे लांगवड तंत्र,




**प्रात्यक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शन भेटीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास - डॉ. जी.व्ही. साळुंके**

आंतरपिक पध्दती आदि गोष्टींची सखोल माहिती घेतली.

विविध विद्यापीठांतील नवीन तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी शैक्षणिक भेटी या महत्वाच्या असतात तसेच कृषि प्रदर्शन पाहिल्याने विद्यार्थ्यांना नविन तंत्रज्ञानाची माहिती होऊन कृषिच्या विद्यार्थ्यांमार्फत हे नवीन तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत लवकर पोहोचण्यास मदत होते. कृषि हा भारताचा मुख्य आर्थिक कणा असून कृषिचे विद्यार्थी कृषि क्षेत्राचा विकास करण्यात अग्रेसर आहेत. त्यामुळे हे महाविद्यालय विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देत आहे असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंके यांनी केले. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्याकरिता डॉ.जी.व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहल विभाग प्रमुख प्रा.एस.एस. राठोड, प्रा. पी.बी. मांजरे, प्रा. एस.व्ही राठोड, डॉ.एस.जी. माने, प्रा. एल.एम. बोंद्रे आणि प्रा.ए.जी. गार्डी यांनी परिश्रम घेवून सहल यशस्वी केली. बारामती येथील शैक्षणिक भेटीनंतर विद्यार्थ्यांनी समाधानकारक प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

# मनिषा खाडे यांचा पीएमश्री जि.प.मा.शाळा पालीच्या वतीने सत्कार



बीड (प्रतिनिधी)

पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे कार्यरत असलेल्या सहशिक्षिका श्रीमती खाडे मनीषा रामकृष्ण यांना यावर्षीचा मातृभूमी प्रतिष्ठान बीड तर्फे दिला जाणारा मातृभूमी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचा पाली पीएमश्री जि.प. शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.


पी.एम.श्री. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली येथे कार्यरत असलेल्या विद्यार्थी प्रिय सर्व गुण संपन्न तंत्रस्नेही गुणवत्ता विकास पूर्ण अध्यापन करणार्या सहकारी, प्रेरक, मार्गदर्शक अशा विविध कार्याची मातृभूमी प्रतिष्ठानच्या निवड समितीने दखल घेत त्यांची यावर्षीच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली. हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. श्रीमती मनिषा खाडे यांनी शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले असून, विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन त्या सतत करत असतात, आनंददायी शिक्षणातून मुलांना शिक्षणासाठी प्रेरित करतात, वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना त्या सहकार्य करत असतात, त्यांच्या याच कार्याची दखल मातृभूमी प्रतिष्ठान घेवून त्यांना ह.भ.प.राधाताई महाराज, ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, समाजसेवक संजय कोठारी, माजी आ.उषाताई दराडे, अकोला जिल्हा शल्यचिकीत्सक तारा वारे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, रामदास हांगे, उत्तमराव मिसाळ, प्रा.ज्ञानेश्वर वाघे व इतर मान्यवरांच्या हस्ते श्रीमती खाडे मनीषा रामकृष्ण यांना शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीमती खाडे मनीषा यांना मातृभूमी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल पीएमसी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा

# पुणे येथे राज्यस्तरीय इज्तेमासाठी जालना व छ.संभाजीनगर येथून

### विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था करण्यात यावी - खा.डॉ.कल्याणजी काळे

जालना ।प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील चाकण येथे तीन दिवसीय राज्यस्तरीय इज्तेमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जालना लोकसभेचे खासदार मा.डॉ.कल्याणजी काळे यांनी सदरील धार्मिक कार्यक्रमासाठी मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात भाविक जाणार आहेत.या तीन दिवसीय राज्यस्तरीय इज्तेमा च्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी दि.०१/०२/२०२५ ते ०४/०२/ २०२५ पर्यंत जालना व छ.संभाजीनगर(औरंगाबाद) येथून पुणे तसेच पुणे येथून परतीच्या प्रवासासाठी ४ फेब्रुवारी देखील विशेष गाड्यांची व्यवस्था करण्यात यावी जेणे करून भाविकांना सुविधाचा लाभ मिळावा



तसेच भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी जालना जिल्ह्याचे खासदार डॉ.कल्याणजी काळे यांनी मा.विभागीय रेल्वे व्यवस्थापक, दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभाग यांना पत्र देण्यात आले आहे

# पवनऊर्जा संदर्भातील तक्रारी शेतकऱ्यांनी जिल्हाधकाऱ्यांकडे दाखल कराव्यात-ॲड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी)

पवनऊर्जा प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्याच बरोबर त्यातील खंडणीखोर देखील वाढले आहेत. शेतकऱ्यांनी पवनऊर्जा संच उभारताना जर कोणता नियम भंग होत असेल, तर त्याची तक्रार जिल्हाधकाऱ्यांकडे असलेल्या समितीकडे कराव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

राज्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी संपदित झालेल्या जमीन खरेदी व्यवहारातील गैरप्रकार त्याचप्रमाणे संपादित जमिनीपेक्षा जादा अतिक्रमण करणे, अशा प्रकारामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जिल्हास्तरावर आणि उपविभाग स्तरावर समित्या स्थापन केलेल्या आहेत. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासने, पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे, पवन ऊर्जा प्रकल्पंबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे, त्याचप्रमाणे जमीन मालक, शेतकरी, स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्प विकसक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे, इत्यादी अधिकार दिलेले आहेत.

पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे महाऊर्जा कडील अधिकारी या समितीच्या सदस्य सचिव आहे. यामध्ये सदस्य म्हणून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अधीक्षक अभियंता महावितरण, अधीक्षक भूमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सह जिल्हा निबंधक वर्ग एक, संबंधित उप वनसंरक्षक, संबंधित पवन ऊर्जा प्रकल्पाची विकसक / प्रकल्प धारक यांचे प्राधिकृत प्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त संबंधित शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी इत्यादी सदस्य आहेत. तर निवासी उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जाच्या कोणताही एक अधिकारी निमंत्रक व समन्वयक म्हणून काम पाहतो. उपविभाग स्तरावर असलेल्या समन्वय समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, मुख्यालय तहसीलदार समन्वय तथा सदस्य सचिव, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता जिल्हा परिषद, उपकार्यकारी अभियंता, महावितरण, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तालुका कृषी अधिकारी, संबंधित सहाय्यक वन संरक्षक, संबंधित पवन ऊर्जा विकसक अथवा प्रकल्प धारक यांचे प्रतिनिधी, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि संबंधित गावच्या सरपंच किंवा प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाने ही समिती दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी स्थापन केलेली आहे. मात्र याला वेळोवेळी प्रसिद्धी न दिल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत गेल्या आहेत. त्याचबरोबर संबंधित प्रकल्प विकसक हे देखील यात अनभिज्ञ असल्याने खंडणीखोरा संदर्भात ते तक्रारी करत नाहीत. एकूणच सर्व स्तरावरून संगणमत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळे पवन ऊर्जा संदर्भात जर तक्रारी असतील तर शेतकऱ्यांनी त्या जिल्हास्तरावर अथवा उपविभाग स्तरावर दाखल करून तक्रारींचा योग्य निपटारा करून घ्यावा, असे आवाहन ड. देशमुख यांनी केले आहे.

# पुढच्या २ महिन्यात ९५ गाव वॉटर च काम पूर्ण करा - आमदार बबनराव लोणीकर

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला सुनावले

जालना ।प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील ९५ गाव वॉटर ग्रीड चे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च अधिकाऱ्यांनी शासनाला चुकीची माहिती देऊन संपूर्ण बिल अदा केले आहे अशा परिस्थितीत कंत्राटदार कोणालाही जुमानत नव्हता त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे प्रधान सचिव सदस्य सचिव मुख्य अभियंता व लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः कठोर भूमिका घेतली व त्यामुळे कंत्राटदार संपूर्ण काम करून देण्यास आज रोजी तयार झाला आहे अशा परिस्थितीत पुढच्या २ महिन्यात ९५ गाव वॉटर च काम पूर्ण करा अन्यथा कंत्राट दरासह खोटे बिल अदा करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली जाईल अशा शब्दात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला सुनावले.

वांजोळा येथील उद्धव विहिरीपासून मंठा येथील जलशुद्धीकरण केंद्र जलशुद्धीकरण केंद्रापासून मुख्य जल कुंभापर्यंत व मुख्य जल कुंभापासून गावातील पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी पोहोचणे, या सर्व कामामध्ये हायड्रोलिक टेस्ट करणे, त्यानंतर ही योजना तीन वर्ष चालवने, त्यानंतर या योजनेचे बिल अदा करणे आवश्यक होते परंतु अधिकारी व कंत्राटदार यांनी संगणमताने काम न करताच संपूर्ण बिल उचलले हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे तरीसुद्धा काम पूर्ण करून देण्याच्या अटीवर आपण कंत्राटदार व अधिकारी यांना एक संधी दिली आहे. काम पूर्ण न करता संपूर्ण बिल अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांना व कंत्राटदाराला ही शेवटची संधी आहे त्यांनी सांगितलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास विधानसभेत प्रश्न उपस्थित करणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज मंठा येथे आयोजित आढावा बैठकीदरम्यान स्पष्ट केले

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्य अधिकाऱ्यांनीन मुख्य अभियंता म्हणून मला, सदस्य सचिव व प्रधान सचिव यांना दिलेली माहिती व प्रत्यक्ष आढावा बैठकीदरम्यान गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती यामध्ये मोठ्या बील अदा केलेल्या तारखेपर्यंत हे काही गावात



पाणी गेलेले नाही असेच स्पष्ट होत आहे. अधिकारी व कंत्राटदार यांनी काम पूर्ण करून देतो या अटीवर दोन महिन्यांचा वेळ मागितला आहे त्यामुळे नमूद वेळेत काम पूर्ण न केल्यास किंवा कामात गय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल अशा शब्दात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी अधिकारी व कंत्राटदार यांना कडक शब्दात सुनावले

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी व कर्मचारी यांनी आढावा बैठकीदरम्यान ७० गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याची माहिती दिली याउलट प्रत्यक्ष गाव पातळीवर काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी केवळ ४६ गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याची लेखी माहिती गटविकास अधिकाऱ्यां मार्फत आढावा बैठकीदरम्यान सादर केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी कर्मचारी कंत्राटदार आणि गावात प्रत्यक्ष काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांनी आढावा बैठकीत दिलेल्या माहितीमध्ये आढळली तफावत आढळून आल्यामुळे आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिकाऱ्यांची चांगलीच हजेरी घेतली त्यावेळी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करतो अशी माहिती कार्यकारी अभियंता श्री चव्हाण यांनी दिली.

परतूर येथील १७६ गाव वॉटर ग्रीड व मंठा तालुक्यातील ९५ गाव वॉटर ग्रीड या दोन्ही अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा योजना असून परतुर विधानसभा मतदार संघातील पाच लाख लोकांच्या पिण्याच्या शुद्ध पाण्याचा प्रश्न मिटवणाऱ्या योजना आहेत त्यामुळे या योजनेचे काम पूर्ण करत असताना कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी कुठलाही वेळ काढू पणा किंवा कामात कसल्याही प्रकारची गळ करू नये अन्यथा या सर्व बाबींचे अत्यंत गंभीर अशी परिणाम भोगावे लागतील अशा शब्दात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी कडक शब्दात अधिकारी व कंत्राटदार यांना सुनावले

यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकार्यांच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे तहसीलदार सोनाली जोंधळे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण गटविकास अधिकारी श्री गगनबोने तालुकाध्यक्ष सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे विलास घोडके आनंद जाधव विठ्ठलराव काळे रामकिसन बोडके नवनाथ खंदारे राजेभाऊ खराबे रावसाहेब बाहेकर माऊली गोंडगे कैलास चव्हाण गणेशराव चव्हाळ दिगंबर बोराडे परमेश्वर शिंदे पोपटराव खंदारे दत्ताराव कांगणे आबासाहेब सरकटे अशोक बोराडे बाबाजी जाधव दत्ता खराबे सचिन राठोड जानकीराम चव्हाण सोपान वायाळ शरद पाटील शिवशंकर डोईफोडे रामेश्वर इंगळे भगवान देशमुख रमेश वायाळ श्रीदेव खरात नामदेव बनसोडे प्रेम गोपाल कासट प्रभाकर जाधव राजू राठोड महादेव वायाळ जगदीश जाधव सुनील कांगणे जितेंद्र सरकटे विजय घाडगे प्रकाश मुळे बाळू चौडे प्रकाश गबाळे तानाजी शेंडगे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांचे जिल्हापरिषद बैठकीत निर्देश

विशेष प्रतिनिधी :- लोकप्रतिनिधी म्हणून लोक कल्याणाच्या योजना साकारून सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यापर्यंतची धोरणात्मक जबाबदारी ही लोक प्रतिनिधी म्हणून आम्ही स्वीकारली आहे. मात्र शासनाच्या योजना प्रत्यक्षात साकाराम्याच्या कामात जर कोणी हलगर्जीपणा किंवा टाळाटाळ करीत असेल तर अशा अधिका-यांविरुद्ध कठोर कारणाईचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी दिले जिल्हा परिषदेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, या बैठकीस आमदार चरणसिंह ठाकूर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा गौरकर, भाजप नेते अनिल निधान जिल्हा अध्यक्ष स्पधाकार कोहळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मनोहर कुंभारे, जि. प सदस्य राधाताई अग्रवाल, जि. प





सदस्य पार्वताबाई काळबाई, जि.प. सदस्य व्यंकट कारेमोरे, जिल्ला आरोग्य अधिकारी, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाचे प्रमुख या बैठकीस उपस्थित होते. राज्य सरकार शासन सर्वसामान्यांसाठी ज्या यौजना जाखते ती कामे पूर्णत्वास नेणे, त्या कामातील गुण्णवत्ता, दर्जा राखणे यासाठी निधी उपलब्ध व्हावा या दृशीने सर्व संबंधित विभागाचे मंत्री व सचिव यांच्यामध्ये समनाय साधा ही जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून प्रशासनाची पण आहे मागील काही वर्षात झालेल्या पाणीपुरवठा योजना, अंगणवाडी बांधकाम, पांदन रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषधांची उपलब्धता व इतर विकासकामांबाबत अनेकांच्या तक्रारी आहेत, पाणीपुरवठा योजना राबविताना जीपर्यंत पाण्याचा मूळ स्त्रीत

होत नाही तोपर्यंत इतर पाईपलाईन व कोणतीच कामे करू नयेत अशा स्पष्ट सूचना शासनाने दिल्या आहेत. असे असतानाही मूळ स्त्रोत नसताना कामे झाल्याच्या तक्रारी आहेत. जर ही वस्तुस्थिती असेल तर संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करू, असे त्यांनी सांगितले. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशीचे निर्देश देऊन ही चौकशी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्यास सांगितले. प्रत्येक विकासकामांना जिओं टॅग करण्याच्या सूचना त्यांनी केल्या प्रत्येक कामे ही विभागप्रमुखांनी स्वतः तपासून घेतली पाहिजेत. वेळोवेळी आम्हीसुद्धा ग्रामीण भागात या कामांबाबत प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी करू असे त्यांनी सांगितले जिल्हा परिषदेच्या योजना या ग्रामीण विकास यंत्रणेच्या माराखड्यानुसारच होणे अभिप्रेत आहे. संपूर्ण जिल्ह्याया अर्थात पागीण भागाच्या विकासाचा आराखडा हा वेळोवेळी ग्रामीण विकास यंत्रणेकडून तयार केला पाहिजे. या आराखतधानुसार विविध वार्षिक योजनांतर्गत त्याला प्राधान्य दिले पाहिजे. आवास सारख्या योजनांना अधिक जबाबदारीने वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या मुद्रांक शुल्याचे मिळणार १६८ कोटी जाढावा बैठक सुरू असताना जिल्हा परिषदेचे १६८ कोटी रुपये मुद्रांक शुल्क विभागाकडे प्रलंबित असल्याची माहिती लेखा विभागाने त्यांना दिली. याबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी ही अधिका- पांची आहे, असे सांगून त्यांनी मुद्रांक शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांना संपर्क साधण्यास सांगितले, बैठक सुरू असतानाच त्यांनी दूरुवनीवर वरिष्ठ अधिका-यांशी बोलून मुद्रांक शुल्कचे १६८ कोटी रुपये तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले,



## उखळी वनपरिक्षेत्रात अवैधरित्या अतिक्रमण करुन विहीर खोदकाम करताना वनविभागाची कार्यवाही

### वन विभागाची मोठी कार्यवाही दोन पोकलेन जप्त

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील उपविभाग वनपरिक्षेत्र जालना अंतर्गत असलेले उखळी नियतक्षेत्र उमरीमधील राखीव वन कक्ष क्र. ३३४ मध्ये गट क्र.९ मधील वनक्षेत्रात अवैधरित्या अतिक्रमण करुन विहीर चे खोदकाम करीत असल्याची गुप्त माहितीदारामार्फत माहिती मिळाल्यावर उखळी नियतक्षेत्र उमरीमध्ये राखीव वन कक्ष क्र. ३३४ मध्ये गट क्र. ९ मधील वनक्षेत्रावर अतिक्रमण करून दोन पोकलॅन मशीन च्या साह्याने अवैधरित्या विहीर चे खोदकाम करत असल्याने वनविभागाच्या पथकाने कारवाई करुन दोन्ही पोकलॅन मशीन मॉडेल नं.२१०-७ सिरिज नं.एन६०१००३६८२ , मॉडेल नं.आर२२०एल सी -७ सिरिज नं.एन६०२०००८०० या दोन पोकलॅन मशीन वनविभागाने जप्त केलीआहे.सदर इसम याच्या विरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६एजीई,एचएफ व अन्वये वनगुन्हा अंतर्गत नोंद करण्यात आला आहे ही कार्यवाही मा.सुवर्णा माने,उप वनसंरक्षक पा.छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री एस.एन.मुंढे, सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना,श्री के.डी.नागरगोजे, वनपरिक्षेत्र अधिकारी जालना प्रा.उत्तर,श्री एन.ई.राऊत वनपाल जालना,श्री बी.एम.पाटील वनपाल अंबड,कु.सी.ए.खरात वनरक्षक उमरी,श्री बी.व्ही.घुगे वनरक्षक जालना,श्री एन.एच.सोडगीर वनरक्षक सिधीकाळेगाव,श्री ए.वरशीळ वनरक्षक,श्री के.वाकोदकर वनरक्षक,श्री जी.नागरगोजे वनरक्षक,श्री एस.पी.कोल्हे वनरक्षक बावणेपांगरी,श्री एम.आर.कळमकर वनरक्षक काजळा,श्री एस.बी.राठोड वनरक्षक उज्जैनपुरी,श्री एम.टी.वाघमारे वनरक्षक,श्री भाऊराव निवृत्ती व्यवहारे वनमजूर,श्री भास्कर भाटसोडे वनमजूर

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड उपतालुकाप्रमुखपदी दादासाहेब सोनवणे यांची निवड

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव गुंदा येथील निष्ठावंत शिवसैनिक दादासाहेब सोनवणे यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व संपर्क नेते सुनिलजी प्रभू साहेब व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या आदेशानुसार व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या शुभ हस्ते व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेच्या सिद्धि विनायक कॉमलेकस बीड येथील जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात त्यांना नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी बोलताना वरेकर व सातपुते म्हणाले की, येणाऱ्या काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे व त्या जिंकायच्या आहेत यासाठी गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक हि उभारणी पुन्हा एकदा करायची आहे त्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब माणसापर्यंत पदाधिकारी व शिवसैनिकांनी जाऊन पक्ष वाढीसाठी ताकदीने काम करावे असे आवाहन केले यावेळी जिल्हा सचिव श्रीकृष्ण गायके ,उपसरकलप्रमुख सिध्देश्वर गव्हाणे , भिमराव कुटे ,दिपक घोडके , दत्ता सुरवसे ,प्रविण पवार ,प्रविण आनेराव , देविदास नागरगोजे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# पावर प्लॅन्ट चे केबल चोरी करणारे दोन सराई जेरबंद, ९ गुन्हे उघडकीस जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना ।प्रतिनिधी

परतूर व घनसावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बऱ्याच दिवसांपासून पावर प्लॅन्ट वरील केबल वायर चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत होते.पावर प्लॅन्ट चे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पावर प्लॅन्ट वरील केबल वायर चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सुचना देऊन मार्गदर्शन केले होते.त्यासंदर्भात दि.१५ रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे पावर प्लॅन्ट च्या गुन्ह्याची माहिती घेत असतांना गुप्त बातमी दारा मार्फत सदर गुन्ह्याची माहिती मिळाली की सदर गुन्हा खोबऱ्या शिवाजी काळे वय २३ वर्षे रा.पाडळी पुनर्वसन ता.परतूर,रंगा सुरेश पवार वय १९ वर्षे रा.अंनदवाडी रोड परतूर मुळ राहणार मोढा भाग सेलू जि.परभणी यांनी केल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यावरुन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी चा शोध घेत त्यांना ताब्यात घेऊन आरोपींना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूली दिली आणि मागील आठवड्यात मध्ये आम्ही दोघे व गोविंद बाळू काळे रा.पारधी वाडा परतूर याला सोबत घेऊन तिघेजण मिळून मसला गावाजवळील टाटा कंपनीच्या सोलार प्लॅन्ट चे केबल वायर कट करुन चोरुन ते केबल वायर नाल्यांमध्ये जाळून त्यामधील निघालेल्या तांब्याची तार अंदाजे १०० किलो जवळ अमन चाऊस रा.पारधी वाडा परतूर याला ५०० रुपये किलो प्रमाणे विक्री केले होते.त्यातून आलेले पैसे तिघा मध्ये वाटून घेतले व ते पैसे आमच्याकडून खर्चही झाले आहे.असे सांगितले गोविंद बाळू काळे व अमन चाऊस या दोघांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही.आरोपीकडून पावर प्लॅन्ट वरील वायर चोरीचे गुन्हे दाखल पोलीस ठाणे परतूर गु.र.नं.५५६/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. गु.र.नं.४६३/२०२४ कलम ३०३ (२)भा.न्या.सं.गु.र.नं.४२६/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.गु.र.नं. ,३९४/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. गु.र.नं.५१८/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.घनसावंगी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हे गु.र.नं. ५४९/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.गु.र.नं.५३०/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.गु.र.नं.३१९/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.असे एकुण गुन्हे उघडकीस आले आहे.सदरील कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री अजय कुमार बन्सल,मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव,सपोनि योगेश उबाळे,पोउपनि राजेंद्र वाघ,व सोबत स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पव्हरे, फुलचंद गव्हाणे, सुधीर वाघमारे, सतीश श्रीनिवास,इरशाद पटेल यांनी केली आहे.



# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शांततेत सुरळीत पार पडली

**प्रतिनिधी । धारूर**

देशातील गुणवंत विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन अतिउच्च गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयात प्रवेश देण्यात येतो. बीड जिल्ह्यातील अतिउच्च गुणवंत विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालय गडी तालुका गेवराई येथील केंद्रीय विद्यालयात प्रवेश दिला जातो. यासाठी विद्यार्थी व पालक खूप परिश्रम घेतात विद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर आपल्या पाल्याचे भविष्य घडेल अशी पालकांची व विद्यार्थ्यांचे अपेक्षा असते. या नवोदय विद्यालयाची प्रवेश पूर्व परीक्षा आज दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी धारूर येथे राजमाता जिजाऊ महाविद्यालय किल्ले धारूर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किल्ले धारूर या ठिकाणी घेण्यात आली या परीक्षेला काहीही गालबोट न लागता कडे कोट पोलीस बंदोबस्तामध्ये सुरळीतपणे व शांततेत पार पडली. नवोदय प्रवेश परीक्षा साठी विद्यार्थ्यांची उपस्थिती देखील चांगली दिसून आली. विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षा पेपर शांततेने व चिकाटीने देखील सोडवला यामुळे दोन्हीही सेंटरवर परीक्षा शांत रीतीने पार पडली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या सेंटरवर एकूण ३१२ विद्यार्थ्यांपैकी ३०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय या ठिकाणी ४०२ विद्यार्थ्यांपैकी ३८५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर या ठिकाणी केंद्र पर्यवेक्षक म्हणून हकीम सर यांनी काम पाहिले तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किल्ले धारूर या ठिकाणी गणेश आकुस्कर यांनी काम पाहिले. सर्व शिक्षक कर्मचारी यांनी देखील परिवेक्षकाचे काम उत्तम प्रकारे पार पाडले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# बीडसह मराठवाड्यात एवढे गावठी कट्टे कुठून येतात? खाकीचा धाकच राहिला नाही

## त्याच्या तस्करीचा मार्ग कोणता? शोध लावण्याचा अत्यंत गरजेचे

प्रतिनिधी । बीड

संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा चर्चेत आला आहे. पण जेवढी चर्चा या बीड जिल्ह्याची आहे तेवढीच चर्चा या बीड जिल्ह्यातील पिस्तुल आणि गावठी कट्ट्यांची आहे. फक्त बीडच नव्हे तर मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षांत गावठी कट्ट्यांची विक्री वाढली आहे. पण मराठवाड्यात गावठी कट्टे नेमके येतात कुठून असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

पिस्तुलातून हवेत बार उडवणे हे मराठवाड्यात आता नेहमीचेच झालं आहे. परळीच्या निमित्ताने हा मुद्दा समोर आला. मराठवाड्यात किती गावठी कट्टे येतात आणि कुठल्या जिल्ह्यात किती वापरले जातात याची माहिती घेतली आणि पुढे आलं धक्कादायक वास्तव.

### कोणत्या जिल्ह्यात किती जणांवर कारवाई?

- छत्रपती संभाजीनगर ग्रामीण : ०७
- बीड : २६ गावठी कट्टे कारवाई
- धाराशिव : १३ गावठी कट्टे कारवाई
- जालना : १६ गावठी कट्टे कारवाई
- नांदेड : ४४ गावठी कट्टे कारवाई
- लातूर : ८ गावठी कट्टे कारवाई
- हिंगोली : ११ गावठी कट्टे कारवाई
- परभणी : ०६

मराठवाड्यात गावठी कट्टे विक्री करणारे एक रॅकेट आहे. खंडणी आपण आणि इतर गुन्ह्यासाठी धमकावण्यास या गावठी कट्ट्याचा वापर केला जातो.



बीडमध्ये हे कट्टे येतात तसे यावर एक नजर टाकूया

मराठवाड्यातील गावठी कट्टे बहुतेकदा अवैध मार्गाने बनवले जातात किंवा बाहेरील राज्यांमधून आणले जातात. या कट्ट्यांची निर्मिती आणि वितरण हे पूर्णपणे अनधिकृत व बेकायदेशीर असते.

गुन्हेगारी मागणी: राजकीय दबाव, स्थानिक वाद, किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांमध्ये गावठी कट्ट्यांची मागणी वाढते, ज्यामुळे त्याचा प्रसार होतो.बंदुकीचा परवाना काढण्यासाठी अनेक परवानग्या काढव्या लागतात. त्यामुळे शस्त्र परवाना काढणं हवं तेवढं सोपं नाही. पण गावठी कट्टा सहज मिळून जातो, तेही वीस ते पंचवीस हजार रुपयात. यासाठी ना कोणती एनओसी लागते ना, कोणत्या कार्यालयात खेट्या घालाव्या लागतात. त्यामुळे मराठवाड्यात गेल्या काही वर्षात गावठी कट्ट्यांचे प्रमाण वाढलं आहे. याच गावठी कट्ट्यांमुळे टोळक्यांचं प्रमाण वाढलं. बरं आता या टोळक्या एवढ्या मस्तावल्या आहे की, त्यांना वाटेल त्याचा ते जीव घेत आहेत.

### कट्टे कसे तयार होतात आणि कुठून येतात?

उत्तर भारतातील राज्ये: उत्तर प्रदेश, बिहार, आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अशा गावठी शस्त्रांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होते. मराठवाड्यात या शस्त्रांची तस्करी करून आणली जाते.स्थानिक निर्मिती: काही वेळा मराठवाड्यातील दुर्गम भागात, लहान गावांत किंवा जंगल परिसरातही कट्टे तयार होतात. यासाठी अर्धशिक्षित कारागीर किंवा लोहार त्याचा वापर करतात.तस्करीचे मार्ग: हे शस्त्र स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांकडून रेल्वे, रस्ते वाहतूक किंवा खाजगी वाहने वापरून मराठवाड्यात पोहोचते.



# महात्मा बसवेश्वर एज्युकेशन सोसायटी टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेज

## आंबेजोगाई येथे गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी । अंबाजोगाई

भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) कडून टी.बी. गिरवलकर पॉलीटेक्निक कॉलेज आंबेजोगाई येथे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गांमध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव जाणून येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू,मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक करतात यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींनात्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात, यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला.आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे, एक्सचेंज ट्रेडेड फंड ईटीएफ,गव्हर्नमेंट बॉण्ड इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमास भरपूर संख्येने महा विद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना सेबीची वेबसाईट व सेबीच्या सारथी पचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी टी.बी. गिरवलकर पॉलीटेक्निक कॉलेजचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे सर, सचिव श्री.माधवराव पाटील सर,कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय. खडकभावी यांनी प्रयत्न केले

# मिशन जरेवाडी सर्व शाळांसाठी नवसंजिवनी ठरणार - गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

प्रतिनिधी । वडवणी

आपल्या बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातील जरेवाडी पॅटर्नचा संपूर्ण राज्यात गौरव केला जातो. आता हाच पॅटर्न बीड जिल्हा परिषदेच्या वतीने संपूर्ण बीड जिल्ह्यातील शाळांमध्ये राबविला जाणार आहे. या अभियानातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय आपणांस साध्य करण्यात येणार आहे. मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा निपूण भारत अभियानांतर्गत एक पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बीड जिल्हा परिषदेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणींचे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळे निश्चितपणे मिशन जरेवाडी हे अभियान सर्वच शाळांसाठी एकप्रकारे नवसंजिवनीच ठरणार असल्याचे प्रतिपादन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील लोकमान्य टिळक महाविद्यालय याठिकाणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या संकल्पनेतून सुरु केलेला मिशन जरेवाडी या शालेय गुणवत्ता विकास अभियान या उपक्रमाचा शुभारंभ काल दि.१७ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी वडवणी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी पोहनेरकर साहेब, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे उपप्राचार्य कुलकर्णी सर, प्रा.सचिदानंद तांदळे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश धायतिडक सर, चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर, काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर, देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश चव्हाण सर, यांसह सर्व केंद्रिय मुख्याध्यापक, सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, सर्व साधन व्यक्ती, विषय तज्ञ, व गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना सहाय्यक गटविकास अधिकारी पोहनेरकर साहेब म्हणाले की, बीड जिल्हा परिषदेच्या वतीने अतिशय सुंदर असा सुरु करण्यात आलेला मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा उपक्रम संपूर्ण वडवणी तालुक्यातील शाळांमध्ये अतिशय सुक्ष्मपणे राबविण्यात यावा व हा उपक्रम सर्वांनी यशस्वी करावा असे आवाहन त्यांनी केले. तसेच यावेळी पुढे बोलतांना गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे म्हणाले की, मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान हा निपुण भारत अभियानांतर्गत एक पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बीड जिल्हा परिषदेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणीचे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शिक्षक, विद्यार्थी आणि समाज यांनी एकसंघपणे कार्य केल्यास एक उत्कृष्ट शाळा कशी घडते याचे उदाहरण आपणांस आपल्याच जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील जरेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेने दाखवून दिलेले आहे. दूर्गम भागातील शाळा असूनही अनेक समस्यांवर मात करत गेल्या अनेक वर्षांपासून शाळेत सुरु असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम आणि त्याचे फलित म्हणून वाढलेली पटसंख्या आणि गुणवत्ता वाढ या सर्वांची प्रेरणा घेवून बीड जिल्ह्यातील सर्व शाळा जरेवाडी सारखे मॉडेल म्हणून विकसित व्हाव्यात या उद्देशानेच या अभियानास मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान असे नाव देण्यात आलेले आहे. शिक्षण विभागातील कार्य करणारे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रिय मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी या सर्वांनी या गुणवत्ता विकास अभियान चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेवून वडवणी तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेची संपादनूक पातळी वाढविण्यासाठी सातत्याने भरीव प्रयत्नांची आवश्यकता आहे. या कार्यक्रमात वरील सर्व घटकांनी आपले योगदान देवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून हा मिशन जरेवाडी अभियान उपक्रम निश्चितपणे यशस्वी करु याची मला खात्री आहे असेही शेवटी गटशिक्षणाधिकारी उजगरे म्हणाले.



वडवणी तालुक्यात मिशन जरेवाडी अभियानाचा प्रारंभ

# धनंजयलाही आत घाला, त्याला सरकारी जेवण जेऊ द्या

प्रतिनिधी । बीड

सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांच्या मागे धनंजय मुंडे हेच आहेत. त्यांनाही आत घाला, त्याला सरकारी जेवण जेऊ द्या, अशी मागणी थेट अजित पवारांकडे सारंगी महाजन यांनी केली आहे. सारंगी महाजन या पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या मामी आहेत. कुटुंबातील व्यक्तीनेच धनंजय मुंड आणि पंकजा मुंडे यांच्यावरही गंभीर आरोप केले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर दुसऱ्याच दिवशी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे होता. केवळ मंत्रीपदाचा नाही तर आमदारकीचाही राजीनामा दिला पाहिजे होता, असेही सारंगी महाजन यांनी म्हटले आहे. सारंगी महाजन यांनी आज (शनिवार) संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली, त्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

सारंगी महाजन म्हणाल्या की, धनंजय मुडेंचे टोळभैरव बीडला बिहारसारखं खराब



करत आहेत. वाल्मिक कराडला फक्त आत घातले. धनंजयलाही आत घाला. त्याला सरकारी जेवण जेऊ द्या, अशी मागणी त्यांनी अजित पवारांकडे केली. सारंगी महाजन म्हणाल्या की, अजित दादा धनंजय बद्दल योग्य निर्णय घेतील. मस्साजोगच्या घटनेनंतर त्याने नैतिकतेच्या आधारे स्वतः दुसऱ्या दिवशीच राजीनामा द्यायला पाहिजे होता. तो बीडचे नेतृत्व करतो. त्याने आमदारकीचाही राजीनामा द्यावा.

धनंजय मुंडेबद्दलची दहशत बीडच्या जनतेमध्ये आहे. त्याचं विमान फार उंचावर गेलं आहे, ते बीडची जनताच खाली उतरवले. त्याला आत घेतले पाहिजे. त्याचे सर्व व्यवहार बाहेर काढावे. अशी मागणी सारंगी महाजन यांनी केली. मस्साजोगच्या घटनेमधील आरोपी वाल्मिक कराडवरुन महाजन यांनी धनंजय मुंडेंसह पंकजा मुंडे यांच्यावरही आरोप केले.

मंत्री धनंजय मुंडे यांच्या मामी सारंगी महाजन यांनी मस्साजोगमधील सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची शनिवारी भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. माझी आंबेजोगईच्या जमीनीचा कोर्टातून निकाल लागल्यानंतर त्या जमिनीचे पैसे आल्यास संतोष देशमुख यांच्या मुलांच्या कुटुंबियांच्या शिक्षणासाठी आपण मदत करु असेही सारंगी महाजन म्हणाल्या आहेत. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचे दु:ख आणि माझे दु:ख एकसारखेच आहे. मी सोळा वर्षे एकटी लढत आहे. तर संतोष देशमुख यांच्या कुटुंबाच्या पाठीशी अख्खे गाव उभे आहे. हाच काय तो फरक आहे. मी ११ वर्षे सामाजिक कार्य करीत आहे. सोळा वर्षांपूर्वीचे माझे दिवस मला आठवले. धनंजय मुंडे आणि पकंजा मुंडे यांनी कुटुंबाला भेट दिलेली नाही यावरुन त्यांचे या प्रकरणात हात किती बरबटले आहेत हे कळतं, असा गंभीर आरोप सारंगी महाजन यांनी केला.

माझ्या जमीनीच्या व्यवहारात धनंजयने मला फसवले. मी वारंवार त्याला सांगितले की, रजिस्ट्रेशन रद्द करुन तुझे पैसे घेऊन जा, मी ते पैस तसेच कपाटात ठेवले आहेत. खर्च देखील केले नाहीत, असे मी त्याला सांगितले. त्याची पत्नी राजश्रीला फोन करुन सांगत होते. मी त्याला फोन केला तर तो थेट म्हणाला की, मामी तुम्ही फॉलोअप ठेवला नाही. इतके दिवस आम्ही जमीन सांभाळत आहोत, असा तो बोलत होता. मी त्याच्यापेक्षा वयाने आणि मानाने मोठी असताना त्याने मला असे बोलणे शोभते का? त्याला लाज नाही वाटत का? तू जमीन सांभाळत होतास तर स्वत:हून पुढे का नाही आलास, असा सवाल सारंगी महाजन यांनी केला. त्या म्हणाल्या की, प्रत्येकाला जाताना सहा फुटाचा कपडा लागतो.



# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आसुबाई विद्यालयाचे यश

प्रतिनिधी । परळी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून पापनाथेश्वर विद्यालय नाथरा येथे आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये आसुबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली सुधाकर नागरगोजे हीने प्रथम क्रमांक पटकावला.

पापनाथेश्वर विद्यालयातर्फे प्रमाणपत्र ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सोनालीला सन्मानित करण्यात आले या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्था सचिव,सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक व सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले.

# खादिमीने उम्मत नांदेड येथील प्रश्न मंजुशा मध्ये सर सय्यद अहेमद खान सेमी इंग्रजी आणि पिपल्स उर्दू हायस्कूल यांची यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी । नांदेड

नांदेड येथील खादिमीने उम्मत यांच्या वतीने दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रश्न मंजुषा परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांना ६०० प्रश्नांच्या उत्तरांची तयारी करायची होती. सर सय्यद अहेमद खान सेमी इंग्लिश आणि पीपल्स हायस्कूलने नेहमीप्रमाणे आपली परंपरा कायम ठेवत संपूर्ण महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवला आहे.ग्रुप बीमध्ये, इयत्ता ९वी चा विद्यार्थी शेख रासिक अनस वासिक नदीम यांनी १०० पैकी ९८ गुण मिळवले.ग्रुप एमध्ये, पहिला क्रमांक सय्यद अल्मिश यासेर यांनी १०० पैकी ९३ गुण मिळवले.दुसऱ्या क्रमांकावर हफसा रहमान फार्मान यांनी १०० पैकी ९२ गुण मिळवले.



इयत्ता नववी चा रासेक अनस महाराष्ट्रात प्रथम

# सात गावाचा लाईट सुरळीत करा:- राजेंद्र आमटे

## नवीन मंजूर ट्रान्सफॉर्मर तत्काळ बसावा

प्रतिनिधी । बीड

**गेली चार पाच वर्षा पासून खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवान प्रिंप्री, नागपूर खुर्द, उमरद खालसा, नागपूर बुद्रुक, उमरी, अंथरवण पिंप्री तांडा या सात गावाचा विद्युत पुरवठा सुरळीत होत नाही शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होत नाही सात गावात लाईट रोज रात्री चार ते पाच तास लाईट नसते वारंवार पाठपुरावा करून हि १९७० ते ८० च्या दशकातील विद्युत तारा बदललेल्या नाहीत दर रोज लाईट फॉल्ट होत आहेत**

सात गावांनी पाठपुरावा करून ५ीि चा नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर होऊन हि बसवला जात नाही तो तत्काळ बसवण्यात यावा व सात गावाचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा या मागणी साठी अधीक्षक अभियंता महावितरण जालना रोड येथे निवेदन देण्यात आले नवीन मंजूर ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यावा, जुन्या तारा बदलून नवीन तारा बसावा, शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा करण्यात यावा अन्यथा सात गावातील शेतकऱ्यांना सह नागरिक तीव्र आंदोलन करतील असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, अंगद आमटे, दीपक आमटे, प्रवीण आमटे, तेजस आमटे, चेतन आमटे, जालिंदर सोळुंके, श्रीराम खुरणे, प्रवीण शिंदे, आकाश टेकाळे, खाजा भाई पठाण, यांच्या वतीने निवेदन देऊन इशारा देण्यात आला आहे

# बीड रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या

## अहेमदनगर-बीड-परळी दरम्यान असलेल्या सर्व रेल्वे स्टेशनवर उर्दू भाषेतून नावे लिहा

## एआयएमआयएम पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांची मागणी

**प्रतिनिधी । बीड**

लवकरच बीड रेल्वे स्टेशनचे उद्धाटन होणार आहे. तत्पूर्वी बीडच्या रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे तसेचअहेमदनगर-बीड- परळी या रेल्वे मार्गादरम्यान जेवढी रेल्वे स्टेशन्स आहेत त्या सर्व रेल्वे स्टेशन्सवर उर्दू भाषेतूनही नावे लिहिण्यात यावे अशी मागणी एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड रेल्वे स्टेशनचा उद्धाटन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी शासनाने निश्चित केलेला आहे. तत्पूर्वी सदरील रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव देण्यासाठी बीड जिल्ह्यातील बऱ्याच सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी निवेदन दिलेले आहे. आमचीही मागणी हीच आहे की, बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. तसेच अहेमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गदरम्यान असलेल्या सर्व रेल्वे स्टेशनवर ऊर्दू भाषेतूनही नामफलक लावण्यात यावे. देशभरात ज्या ठिकाणी रेल्वे मार्ग व सेवा आहे त्या-त्या ठिकाणी रेल्वे स्टेशनवर इंग्रजीसह, ऊर्दु आणि राज्याच्या स्थानिक भाषेमध्ये बोर्ड लावण्यात येतात. यात प्रामुख्याने ऊर्दु बोर्ड हे देशभरात सर्व रेल्वे स्टेशनवर आहेत. परंतु अहेमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गादरम्यान जेवढे रेल्वे स्टेशन आहेत तिथे फक्त इंग्रजी व मराठी या दोनच भाषेत नामफलक लावण्यात आलेले आहेत. ऊर्दू भाषेत लावण्यात आलेले नाहीत ते बीड रेल्वे स्टेशनच्या उद्धाटना अगोदर ताबडतोब लावण्यात यावे. अशी मागणी एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.





**भाऊंनी उपोषणार्थींची आस्थेवाईक भेट घेऊन दिला पाठिंबा**

बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यासाठी उपोषणाला बसलेल्या चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते अनुरथ सोपानराव वीर यांच्या उपोषणाला एआयएमआयएम पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, मानसे मोमीन अजहर, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा समन्वयक सैफअली लालू भैय्या, मार्गदर्शक रियाज खान, शेख फारूक, शेख सय्यद बासेद, शेख हारुन आदी उपस्थित होते.

# परळीत काम नको रे बाबा!

## औष्णिक केंद्रातील कर्मचाऱ्यांनी करुन घेतल्या बदल्या

**प्रतिनिधी । बीड**

बीडच्या मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण सध्या राज्यभर गाजत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडमधील गुन्हेगारी, राखेचे राजकारण अन् गुंडगिरीचे नवनवे अंक समोर येत आहेत.अशातच राज्यातील प्रमुख औष्णिक विद्युत केंद्रांपैकी एक असलेल्या परळीच्या औष्णिक विद्युत केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या करण्यात आल्या आल्याचे समोर आले आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, सरपंच देशमुख हत्या प्रकरणानंतर परळी थर्मल आणि त्याची राख चांगलीच चर्चेत आली होती.दरम्यान बीडमध्ये काम करणारे लोकं बाहेरील जिल्ह्यात बदल्या करून घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामध्ये १० - २० नव्हे तर तब्बल १५० कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या



आहेत. भुसावळ येथे उभारण्यात येत असलेल्या २५० मेगावॅट च्या प्रकल्पासाठी हे कर्मचारी हलवले गेल्याची माहिती आहे.

परळीत सध्या २५० मेगावॉट चे ३ युनिट आहेत. यासाठी तब्बल ९०० कर्मचारी या ठिकाणी काम करतात मात्र ७५० मेगावॅटचे संच परळीत असताना देखील अतिरिक्त कर्मचारी असल्याच्या नावाखाली परळीतून दीडशे कर्मचाऱ्यांच्या बदल्या या भुसावळ येथे करण्यात आल्या आहेत. बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये स्वतः बदली अर्ज केलेले १२ जण तर कार्यालयाने बदली केलेले असे एकूण ९४ कर्मचारी भुसावळ येथील नवीन प्रकल्पाला हलवलेले आहेत.

### काय आहे थर्मल आणि जिल्ह्याचे समीकरण?

जिल्ह्यासह मराठवाड्यात रोजगाराचे प्रमुख केंद्र म्हणून परळीच्या औष्णिक विद्युत केंद्राची ओळख आहे सध्या तिन्ही प्रकल्पामध्ये ९०० कर्मचारी काम करतात तर हजारो कामगारांचे हात यावर चालतात. दीडशेवर कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याचं समोर येत असलं तरी आणखी काही कर्मचारी या ठिकाणाहून इतरत्र हलवले जाणार असल्याची माहिती आहे. असे झाल्यास बाजारपेठेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

# आता शिक्षकांना लावावी लागणार बायोमेट्रिकवर हजेरी

**प्रतिनिधी । बीड**

राज्यातील अनुदानास पात्र शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती तत्काळ बायोमेट्रिक अथवा चेहरा ओळख प्रणालीद्वारे नोंदवण्याचे निर्देश शिक्षण विभागाने दिले आहेत.तसेच बायोमेट्रिक प्राणाली अवयव चेहरा ओळख प्रणालीद्वारे उपस्थितीची अट पूर्ण करण्यासाठी सर्व अंशतः अनुदानित शाळांना देण्यात आलेल्या मुदतीचे पालन न करणाऱ्या शाळांचे वेतन अनुदान रोखून ठेवण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. शाळेत उपस्थित विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी घेण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. सर्व शाळांना बायोमेट्रिक मशीन देण्यात आल्या आहेत. आता शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजेरीही बायोमेट्रिक पद्धतीने घेतली जाणार आहे. राज्यातील सर्व अनुदान पात्र शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजेरी बायोमेट्रिक प्रणाली किंवा चेहरा ओळख प्रणालीद्वारे नोंदविण्याचे आदेश राज्य सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये दिले आहेत.



**अपडेट द्यावे लागेल**

शाळांमध्ये विद्यार्थी, कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी शिक्षण विभागाकडे संबंधितांना द्यावी लागणार आहे. अपडेट हजेरी दिल्यानंतरच अनुदान मंजुरी, पगार आदींबाबत विचार होणार आहे.

**अनेकांची वाढली अडचण**

काही शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शाळेत न येता आपले घरगुती काम करीत असतात. अशा शिक्षकांची आता अडचण वाढली आहे.

**हा नियम कोणत्या शाळांसाठी?**

राज्यातील अनुदानास पात्र शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी हा नियम लागू असणार आहे.

### शासनाला नव्या नियमाची गरज का भासली?

शाळेत येणारे विद्यार्थी अनेकदा शाळा बुडवून बाहेर जातात. तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीही असेच वागतात. मात्र, हजेरी शंभर टक्के दाखवली जाते. ही बाब शिक्षण विभागाच्या लक्षात आल्याने अंशतः अनुदान प्राप्त शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आलेली आहे. त्यामुळे सुट्टी मारणाऱ्या शिक्षकांना आता पूर्णवेळ शाळेतच राहावे लागणार असल्याचा हा निर्णय आहे.

### अनुदानाला लागणार कात्री

विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आलेली असताना आता अनुदानास पात्र शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही बंधनकारक करण्यात आलेली आहे. बायोमेट्रिक हजेरी नसेल तर शाळेच्या अनुदानाला कात्री बसणार आहे.


# पोलीस दलात आडनावाने नाही तर नावानेच मारली जाणार हाक..!

## ऑन ड्युटी रील्स काढण्यावर निर्बंध

**प्रतिनिधी । बीड**

गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यामध्ये सामाजिक परिस्थिती मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यात दोन घटकांतील तणावही समोर येत आहेत. सामाजिक घटकांबरोबरच पोलिस दलातील सलोखा कायम ठेवण्यासाठी आणि मतभेद व मनभेद टाळण्यासाठी पोलिस अधीक्षकांनी पुढाकार घेतला आहे.

पोलिस दलात यापुढे एकमेकांना हाक देताना आडनाव नाही तर नावाने हाक दिली जाईल. तसेच, कर्तव्यावर असताना रील्स काढण्यावरही पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी निर्बंध घातले.अनेकदा आडनावाच्या उच्चारावरून जातीचा संबोध होतो. ते टाळण्यासाठी नावानेच हाक देण्याच्या सूचना श्री. कॉवत यांनी केल्या. नावाने हाक दिल्याने आपुलकी व जवळीक वाटते,



असेही त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गुन्हेगारीला आवर घालण्यासाठी यापुढे सगळ्या प्रकारची जबाबदारी ठाणेदारांचीच असेल. ठाण्यातील कोणावरही लाचलुचपतची कारवाई झाली, तर त्यालाही ठाणेप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.

रील्सचे फॅडही सर्वत्र वाढले आहे. पोलिस खात्यातसुद्धा कर्मचाऱ्यांपासून अधिकारीही रील्स काढण्याचे प्रकार समोर आले आहेत. अशांनाही नवनीत कॉवत यांनी तंबी दिली आहे. कर्मचाऱ्यांनी ऑन ड्युटी रील्स काढली तर त्याच्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# फेस बुक पोस्ट करून जातीय तेढ निर्माण करणाऱ्या दोघा विरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । बीड**

फेस बुक पोस्ट करून राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह त्यांना दैवत मानणाऱ्या समाजांचा अपमान करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या बाबतची माहिती अशी की, परळी येथील सुनिल फड याने मनोज जरांगे यांना उद्देशून जिजाऊ माँ साहेब आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी भडकावू आणि दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित केली होती. त्यावर केज तालुक्यातील लाडेवडगाव येथील अमोल शेप याने देखील वादग्रस्त कमेंट केली आणि माझा नाईलाज झाल्याने ती पोस्ट डिलीट करावी लागली. अशी पोस्ट सोशल मीडिया आणि फेसबुकवर प्रसारित केली होती.

त्यांच्या पोस्टमुळे राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे चारीत्र्यावर शिंतोडे उडवणारी असल्याने आणि सध्या बीड जिल्ह्यामध्ये जातीय विषमतेचे वाद निर्माण झालेले असल्याने दोन समाजात जातीय तेढ निर्माण करण्यासाठी यातील आरोपी आमोल शेप याने फेसबुक या सोशल मिडीयावर पोस्ट केली. तसेच आरोपी सुनील फड आणि अमोल शेप याने त्या पोस्टवर कमेंट करुन प्रसार माध्यमांवर प्रसारीत करुन दोन समाजांमध्ये तेढ निर्माण केली. म्हणून शुभम लोंढे यांनी दि. १८ जानेवारी रोजी केज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी





वरून सुनील फड आणि अमोल शेप या दोघांच्या विरुद्ध गु. रं. न. २०/२०२५ भा. न्या. सं. १८६, ३५३(२), ३५६(२) नुसार गुंगा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने हे पुढील तपास करीत आहेत.

# वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावरील सुनावणी लांबणीवर

## २० तारखेला होणार पुढची सुनावणी

**प्रतिनिधी । बीड**

संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची संबंधित असलेले खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड यांच्या जामीन अर्जावर आज (दि. १८) होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. कराड याचे वकील ॲड. कवडे यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी पुढील तारखेची मागणी केली होती. त्यामुळे आजची सुनावणी पुढे ढकलण्यात आले असून पुढील सुनावणी २० जानेवारी होणार आहे,



असे सरकारी वकील ॲड. जितेंद्र शिंदे यांनी सांगितले.

खंडणी प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेला वाल्मीक कराड यांच्या जामीन अर्जावर केज येथील क स्तर दिवाणी न्यायालयात न्यायाधिश एस. व्ही. पावसकर यांच्या समोर सुनावणी होणार होती. दरम्यान, ॲड. कवडे यांनी न्यायालयासमोर अर्ज सादर केला की, आज त्यांची प्रकृती ठीक नसल्याने पुढील तारीख वाढवून मिळण्यात यावी. त्यानुसार न्यायालयाने त्यांचा अर्ज मंजूर केला आहे.

# बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर मौलाना सय्यद नजिब साहब यांचे निधन

## आज सकाळी ११ वाजता दफनविधी

**बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर सय्यद नजिब साहब यांचे शनिवार दि.१८ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने शहरातील काकू नाना हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. बीड जिल्ह्याच्या तबलीग जमातचे प्रमुख म्हणून ते कार्यरत होते.**

दरम्यान अमीर साहब सय्यद नजीव मौलाना सहाव यांचा जनाजा आज रविवार दि. १९ जानेवारी सकाळी १० वाजता मरकज मस्जिद पासून निघणार आहे. तर ११ वाजता मोमीनपुरा बायपास रोडवरील बिंदुसरा नदीच्या परिसरातील ईजतेमा मैदानावर नमाज-ए-जनाजा अदा करण्यात येणार आहे. त्यानंतर दफनविधी मासूम कॉलनी मोमीनपुरा बीड येथे होणार आहे.

